सकाळ

करिअर घडविताना

के. रवींद्र



# टेक्निकल एंट्री स्कीम



भारतीय सैन्य दलात भरती होण्याचे विविध मार्ग आहे, त्यातीलच एक म्हणजे १०+२ टेक्निकल एंट्री स्कीम, याअंतर्गत दर वर्षी अर्ज मागविण्यात येतात.

**पात्रता :** १) बारावी सायन्समध्ये किमान ६०% गुण भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (PCM) विषयांसह परीक्षा व विविध राज्य/केंद्रीय बोर्डांची पीसीएम टक्केवारी केवळ बारावीत मिळालेल्या गुणांवर आधारित असेल.

२) जेईई (मुख्य) परीक्षेत बसलेले सर्व अविवाहित पुरुष उमेदवार पात्र आहेत.

**वयोमर्यादा :** किमान वय : साडेसोळा वर्षे व कमाल वय : साडेएकोणीस वर्षे असावे.

**वैद्यकीय व शारीरिक तपासणी :** भारतीय सैन्य दलाची वैद्यकीय मानके आणि सैन्यात अधिकारी म्हणून प्रवेश करण्यासाठी वैद्यकीय तपासणीची प्रक्रिया लागू राहील.

**प्रशिक्षण कालावधी :** ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमी (OTA), गया येथे एकूण प्रशिक्षण ५ वर्षांचे असते, मूलभूत लष्करी प्रशिक्षण १ वर्ष, तर तांत्रिक प्रशिक्षण पुणे किंवा सिकंदराबाद येथे ३ वर्षे व शेवटचे १ वर्ष पदवीकरिता असते.

## आवश्यक कागदपत्रे...

- इयत्ता १०वीचे प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका मूळ ज्यात जन्मदिनांक दर्शवितात.
- इयत्ता १२वीचे प्रमाणपत्र आणि मूळ गुणपत्रिका.
- मूळ आयडी पुरावा.
- JEE (Mains) २०२२ च्या निकालाची प्रत.
- पासपोर्ट फोटो स्वाक्षरी इ. सर्व आवश्यक कागदपत्रे

## निवडप्रक्रिया :

१) सामान्य उमेदवारासाठी प्रक्रिया : टीईएस आणि एनडीए प्रवेशप्रक्रिया समान आहे.

२) उमेदवारांना दोन टप्प्यातील निवड प्रक्रियेद्वारे ठेवले जाईल. जे स्टेज I यशस्वी होतील ते स्टेज II वर जातील. जे स्टेज I मध्ये अपयशी ठरतील त्यांना त्याच दिवशी परत जाईल. मुलाखतीचा कालावधी पाच दिवसांचा आहे आणि त्याचा तपशील भर्ती महासंचालनालयाच्या अधिकृत वेबसाइट www.joinindianarmy.nic.in वर उपलब्ध आहे. यानंतर स्टेज II नंतर यशस्वी उमेदवारांची वैद्यकीय तपासणी केली जाईल.

## परीक्षा पद्धती

प्रश्न आणि संबंधित गुणांचे विषयवार विभाजन -

| क्र. | विषय | प्रश्नांची संख्या | गुण |
|---|---|---|---|
| १ | सामान्य ज्ञान | ५ | २० |
| २ | सामान्य विज्ञान | ५ | २० |
| ३ | गणित | १० | ४० |
| ४ | कॉम्पुटर सायन्स | ५ | २० |
| ५ | इंग्रजी | २५ | १०० |
| | एकूण | ५० | २०० |

- प्रश्न केवळ वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतील.
- एकूण विचारलेल्या प्रश्नांची संख्या २०० गुणांपैकी ५० असेल.
- परीक्षेचा कालावधी ६० मिनिटांचा असेल
- ०.२५ गुणांचे निगेटिव्ह मार्किंग असेल.

**(लेखक विद्यार्थीमित्र या वेबसाइटचे संस्थापक आहेत.)**

Kolhapur, Main
01/03/2023 Page No. 8